


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २५९ •गुरुवार, दि.१८ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# नामांकन वादांना पूर्णविराम? निवडणूक कायद्यात बदलांना मंजुरी



## महापालिका निवडणुकीआधी महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी महाराष्ट्र मंत्रिमंडळाने एक मोठा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी नामांकन पत्रांवरील निवडणूक अधिकाऱ्यांच्या निर्णयाला अंतिम स्वरूप देण्याच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

या मंजुरीमुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेवर व्हाव्यात यासाठी १९६९ च्या कायद्यात सुधारणा करणारा अध्यादेश आणण्यासही मान्यता मिळाली. बेठकीत महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा, १९६१ मध्ये सुधारणांना मान्यता देण्यात आली. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अगदी आधी हे पाऊल उचलण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ ला मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेवर आणि वेळेवर होतील याची खात्री करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. कायद्याच्या कलम १४ (२) च्या विद्यमान तरतुदीनुसार, उमेदवार निवडणूक अधिकाऱ्यांनी नामांकन पत्रे स्वीकृत किंवा नाकारल्याविरुद्ध जिल्हा न्यायालयांमध्ये अपील करू शकतात. अशा अनेक अपीत वेगवेगळ्या जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी प्रलंबित राहिल्यामुळे निवडणुका निर्धारित वेळेत होऊ शकल्या नाहीत. राज्य निवडणूक आयोगाने ही तरतूद काढून टाकण्याचा प्रस्ताव सरकारला दिला होता. त्यानुसार, ही दुरुस्ती राज्य सरकारला अशा निवडणुकांसाठी नियम बनवण्याचा अधिकार देते आणि नामांकन पत्रे स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय निवडणूक अधिकाऱ्यांचा अंतिम निर्णय घेते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, महाराष्ट्रातील ३३६ पंचायत समित्या आणि ३२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत घ्यायच्या आहेत. राज्यातील किल्ले आणि किल्ल्यांसारख्या राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमण रोखण्यासाठी सांस्कृतिक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचा ▶ उर्वरित पान २ वर

## चोरीला गेलेले १८ मोबाईल मूळ मालकांच्या स्वाधीन



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नागरिकांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. महागडे मोबाईल हरवल्यानंतर किंवा चोरीला गेल्यानंतर ते परत मिळण्याची आशा सोडून दिलेल्या नागरिकांना बीड शहर पोलिसांनी सुखद धक्का दिला आहे. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे विशेष शोधमोहीम राबवून तब्बल १८ मोबाईल फोन शोधून काढले आणि ते आज मूळ मालकांना सन्मानपूर्वक परत केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून आणि प्रेरणेतून हा विशेष उपक्रम राबवण्यात आला. अनेकदा मोबाईल चोरीला गेल्यास किंवा हरवल्यास नागरिक पोलीस ठाण्यात तक्रार देतात, पण तपास लागणे कठीण असते. मात्र, बीड शहर पोलिसांनी या गुन्ह्यांचा गांभीर्याने तपास केला. पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कामगिरी फत्ते केली. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप खेडकर, पोलीस ▶ उर्वरित पान २ वर

## ड्रोनने रेकी अन् 100 पोलिसांचा वेढा!

### बीड पोलिसांची धाराशिवमध्ये 'फिल्मी स्टाईल' कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

महामार्गावर प्रवासी आणि वाहनधारकांना अडवून लुटणाऱ्या टोळीचा बीड पोलिसांनी पर्दाफाश केला होता. यातील मुद्देमाल वसुलीसाठी जाताना पोलिसांनी 'फिल्मीस्टाइल' कारवाई केली. आधी गुन्हेगारी वस्तीची ड्रोन कॅमेराद्वारे रेकी केली. त्यानंतर १०० पोलिसांनी चोहोबाजूने घेरत अचानक छापा मारला. तासभर घराची झडती घेऊन लुटलेले ११ तोळ्यांचे दागिने आणि रोख रक्कम असा १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई धाराशिव जिल्ह्यातील खामकरवाडीत सोमवारी दुपारी ४ ते ५ या वेळेत केली. जिल्ह्यातून जाणाऱ्या सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर मागील काही दिवसांपासून लूटमारीच्या घटना वाढल्या होत्या. चार गुन्हेही दाखल



झाले होते. त्यामुळे प्रवाशांसह वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण होते. याच अनुषंगाने बीड पोलिसांनी एलसीबीचे विशेष पथक तयार करत शोध मोहीम सुरू केली. सीसीटीव्ही व खबऱ्यांचा आधार घेत दोन दिवसांपूर्वी अनिल काळे या कुख्यात गुन्हेगारासह त्याचे राहुल काळे आणि विकास काळे हे दोन मुलगे यांना पकडले होते. येथेही पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडले होते. कारचा काच उघडत नसल्याने काचा फोडून पोलिसांनी चोरट्यांना बाहेर काढले होते. यात तीन पोलिस कर्मचारी जखमीही झाले होते. त्यांच्याकडून चार गुन्हे उघड झाले होते. यातील मुद्देमाल हस्तगत करण्यासाठीच सोमवारी दुपारी बीड पोलिसांनी धाराशिव पोलिसांच्या मदतीने सापळा लावला होता. तासभर मोहीम हाती घेत पोलिसांनी चोरीचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, गेवराईचे किशोर पवार, सपोनि पवार, पोलिस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलिस अंमलदार सोमनाथ गायकवाड, मनोज वाघ, अशोक दुबाले, राहुल शिंदे, बाळू सानप, अर्जुन यादव, अंकुश वरपे, विकी सुरवसे, मनोज परजणे, अश्फाक सय्यद, नितीन वडमारे यांनी केली. वाशी तालुक्यातील खामकरवाडीत बहुतांश लोक हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत. पोलिस गेल्यावर ▶ उर्वरित पान २ वर

## कंटेनर-ट्रकचा अपघात; एक ठार



**गेवराई । प्रतिनिधी**

धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील बाग पिंपळगाव बायपास रस्त्यावर कंटेनर आणि ट्रकचा मंगळवारी दुपारी तिन वाजण्याच्या सुमारास समोरासमोर अपघात झाला असून या अपघातात कंटेनर चालक जागीच ठार झाला. दुसऱ्या ट्रकचा चालक व क्लिनर गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी छ. संभाजी नगर येथे हलविण्यात आले आहे. बीडकडुन छ. संभाजी नगर कडे येणारा रिकामा कंटेनर क्रं (टीएस ०७ युएम ७३३४) व छ संभाजी नगर येथून बीडकडे जात असलेला ट्रक क्रं. युपी २१ सीएन ३१९९ या दोन वाहनांचा सदरील बाग पिंपळगाव बायपास येथे उड्डाणपूलाचे काम सुरू असून जवळपास दोनशे मिटरवर एकेरी वाहतूक करण्यात आली असून वाहन चालकांचे आपल्या वाहनावरील ▶ उर्वरित पान २ वर

## वाल्मिक कराडला हायकोर्टाचा मोठा झटका

### संतोष देशमुख हत्या प्रकरणात जामीन फेटाळला ठोस पुराव्यांच्या आधारे महत्त्वपूर्ण निर्णय



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात कराडने दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला असून, त्यामुळे तो पुढील काळासाठीही कोठडीतच राहणार आहे. या निकालामुळे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून, गावासह संपूर्ण परिसरात न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत होत आहे. या संवेदनशील प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले होते आणि आजचा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे.

वाल्मिक कराडने औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १२ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत सविस्तर सुनावणी झाली. मात्र, सरकारी पक्षाचा युक्तीवाद ▶ उर्वरित पान २ वर

## बाळराजे पवारांचा जामीन मंजूर

**बीड । प्रतिनिधी**

नगर परिषद निवडणुकीच्या मतदानादिवशीत गेवराई शहरात झालेल्या पवार-पंडित गटातील राड्याप्रकरणी भाजपचे बाळराजे पवार व अन्य चौघांना अटक करण्यात आली होती. गेवराई न्यायालयाकडून त्यांना आज जामीन मंजूर करण्यात आला आहे. काल या सर्वांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात



आले होते. एक दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर आज पुन्हा आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. या सगळ्यांचा जामीन न्यायालयाने मंजूर केला.

मतदानाच्या दिवशी निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थिती प्रकरणी दाखल गुन्ह्यात कलमवाढ झाल्यानंतर पोलिसांच्या सूचनेनुसार बाळराजे स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाले होते. सोमवार १५ रोजी ▶ उर्वरित पान २ वर

## 'मला आई व्हायचंय' म्हणत २५ लाखांच्या 'प्रेग्नन्सी जॉब'चे आमिष तरुणांना लुटणारी हायटेक टोळी सक्रिय



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

'मला आई बनवण्यासाठी मदत करा, त्याबदल्यात मी २५ लाख रुपये द्यायला तयार आहे', अशा धक्कादायक मेसेजद्वारे तरुणांना जाळ्यात ओढून त्यांची आर्थिक फसवणूक आणि ब्लॅकमेलिंग करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. शहरात 'प्रेग्नन्सी जॉब'च्या नावाखाली सुरू असलेल्या या सायबर गुन्ह्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करणारी मुले, कामगार आणि तरुण मोठ्या संख्येने ▶ उर्वरित पान २ वर









# अल्पसंख्याक हक्क : भारतीय लोकशाहीची सामाजिक व नैतिक कसोटी

भारत हा जगातील सर्वात वैविध्यपूर्ण समाजांपैकी एक आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती, पंथ, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हेच भारतीय समाजाचे वैशिष्ट्य राहिले आहे. या बहुविधतेमुळे भारताला जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख मिळाली असली, तरी याच विविधतेतून अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण झाले आहेत. बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक या संकल्पना केवळ संख्येच्या आधारावर ठरलेल्या नसून त्या समाजातील सत्तासंबंध, संसाधनांवरील नियंत्रण आणि सामाजिक वर्चस्वाशी जोडलेल्या आहेत. १८ डिसेंबर रोजी साजरा होणारा 'अल्पसंख्याक हक्क दिन' हा केवळ एका विशिष्ट समुदायाच्या अधिकारांची आठवण करून देणारा औपचारिक दिवस नसून, तो भारतीय लोकशाहीच्या सामाजिक जाणीवेची, नैतिक अधिष्ठानाची आणि समतावादी मूल्यांची कसोटी पाहणारा महत्त्वाचा प्रसंग आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, अल्पसंख्याक हक्कांचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या आरोग्याशी, सामाजिक सलोख्याशी आणि लोकशाहीच्या भवितव्याशी थेट संबंधित आहे.

समाजशास्त्रात 'अल्पसंख्याक' ही संकल्पना केवळ संख्यात्मक नसून ती गुणात्मक आणि संरचनात्मक स्वरूपाची आहे. एखादा समुदाय संख्येने कमी असला तरी सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी असू शकतो, तसेच एखादा समुदाय संख्येने मोठा असूनही सामाजिकदृष्ट्या दुर्बल असू शकतो. त्यामुळे अल्पसंख्याकत्व हे केवळ आकड्यांवर ठरत नाही, तर त्या समुदायाचे सत्तासंबंधांतील स्थान, संसाधनांपर्यंत पोहोच आणि सामाजिक स्वीकार यावर अवलंबून असते. भारतीय समाजरचनेत बहुसंख्याक समुदायाकडे असलेले सांस्कृतिक वर्चस्व, राजकीय प्रभाव आणि आर्थिक साधनसंपत्ती यामुळे अल्पसंख्याक समुदाय अनेकदा काठावर ढकलले जातात. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क ही संकल्पना 'विशेष सवलत' म्हणून न पाहता, समाजातील ऐतिहासिक आणि संरचनात्मक असमतोल दूर करण्याचा एक आवश्यक उपाय म्हणून पाहणे गरजेचे आहे.

भारतीय संविधानाने अल्पसंख्याक समुदायांना मूलभूत हक्कांच्या माध्यमातून व्यापक संरक्षण दिले आहे. धर्मस्वातंत्र्य, धार्मिक आचार पाळण्याचा अधिकार, सांस्कृतिक आणि भाषिक ओळख जपण्याचे स्वातंत्र्य, तसेच शैक्षणिक संस्था स्थापन व चालवण्याचा अधिकार या तरतुदी भारताच्या बहुसांस्कृतिक वास्तवाची घटनात्मक मान्यता आहेत. संविधान निर्मात्यांना हे स्पष्टपणे माहीत होते की, विविधतेने नटलेल्या समाजात जर सर्व समुदायांना समान संरक्षण दिले नाही, तर सामाजिक असंतोष आणि संघर्ष अपरिहार्य ठरतील. मात्र समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की, घटनात्मक तरतुदी आणि प्रत्यक्ष सामाजिक व्यवहार यांच्यात अनेकदा मोठी दरी असते. कायद्याच्या पुस्तकात असलेले हक्क प्रत्यक्ष जीवनात कितपत अंमलात येतात, हा प्रश्न आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अल्पसंख्याक समुदायांचे दैनंदिन सामाजिक अनुभव पाहिले, तर अनेकदा त्यांना उघड किंवा अप्रत्यक्ष भेदभावाचा सामना करावा लागतो. रोजगाराच्या संधी, शिक्षणातील प्रवेश, घरभाडे, सार्वजनिक सेवांचा वापर, सामाजिक स्वीकार अशा विविध क्षेत्रांत त्यांना वेगळ्या नजरेने पाहिले जाते, अशी भावना अनेक अल्पसंख्याक व्यक्ती व्यक्त करतात. समाजशास्त्र सांगते की, भेदभाव हा नेहमीच थेट आणि हिंसक स्वरूपात दिसून येत नाही; तो अनेकदा सूक्ष्म, अदृश्य आणि 'सामान्य' वाटणाऱ्या दैनंदिन व्यवहारांत लपलेला असतो. संशयाने पाहिले जाणे, सतत आपली निष्ठा सिद्ध करण्याची अपेक्षा ठेवली जाणे किंवा एखाद्या संपूर्ण समुदायाला काही व्यक्तींच्या कृतींसाठी दोषी ठरवले जाणे, हे सर्व सामाजिक भेदभावाचेच प्रकार आहेत. अशा अनुभवांमुळे अल्पसंख्याक समुदायांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढते आणि समाजातील एकात्मतेला तडे जातात.

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती एक मूल्याधिष्ठित सामाजिक व्यवस्था आहे. बहुसंख्याकांचे मत हे लोकशाहीतील एक महत्त्वाचा घटक असला, तरी लोकशाहीची खरी ताकद अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या संरक्षणात असते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, बहुसंख्याकवाद आणि लोकशाही यामध्ये मूलभूत फरक आहे. बहुसंख्याकवाद म्हणजे बहुसंख्याकांच्या इच्छेचे वर्चस्व, तर लोकशाही म्हणजे सर्व घटकांचा सन्मान, सहभाग आणि सुरक्षितता. जर बहुसंख्याकांच्या नावाखाली अल्पसंख्याकांच्या अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या, तर लोकशाहीचे स्वरूप हळूहळू संकुचित होते. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिन हा लोकशाहीच्या आत्मपरीक्षणाचा दिवस ठरतो.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

◆ पान ४ वरून पुढे...

## नामांकन वादांना...

निर्णय बेठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार, किल्ले आणि किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवण्याबाबत संस्कृती विभागाच्या मागील सरकारच्या निर्णयाची व्याप्ती वाढवून त्यात राज्य संरक्षित स्मारकांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील सर्व किल्ले आणि राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे. हटविण्यासाठी आणि भविष्यात होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. संस्कृती मंत्री या समितीचे अध्यक्ष असतील. या समितीमध्ये महसूल मंत्री, ग्रामीण विकास मंत्री, पर्यटन मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, वनमंत्री, बंदरे आणि विकास मंत्री तसेच संबंधित विभागांचे सचिव, प्रधान सचिव किंवा अतिरिक्त मुख्य सचिव यांचा समावेश असेल.

## चोरीला गेलेले...

अंमलदार सुषेण उगले आणि सय्यद शहनशहा यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. पथकाने सायबर तंत्रज्ञानाचा वापर करून आणि सखोल तांत्रिक विश्लेषण करून या १८ मोबाईलचा माग काढला. आज पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते संबंधित फिर्यादींना त्यांचे मोबाईल परत देण्यात आले. आपला हरवलेला फोन पुन्हा सुस्थितीत मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या कामगिरीमुळे पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## ड्रोनने रेकी...

त्यांच्यावर हल्ला केला जातो. त्यामुळेच बीड पोलिसांनी काळजी घेत आरसीपीच्या विशेष तुकडीसह १०० पोलिसांची फौज घेऊन वस्तीला वेढा घातला होता. सोबतच ड्रोनचीही मदत घेण्यात आली. जर एखादा आरोपी पळून गेला तर त्याचा ड्रोनद्वारे पाठलाग केला जाणार होता. त्यांच्या पाठलागासाठी विशेष बंदोबस्तही राखीव होता. येरमाळा पोलिसांचीही यात मदत झाली. किचनमधील डब्यात लपवले दागिने– अनिल काळे हा नाटकं करत असल्याने त्याला कोठडीतच ठेवले होते. त्याची दोन मुले राहुल आणि विकासला घेऊन पोलिस वस्तीत गेले होते. त्यांनी सुरुवातीला मुद्देमाल देण्यास विरोध केला; परंतु खाक्या दाखविताच त्याने किचनमधील एक डब्बा दाखविला. तो उघडल्यानंतर त्यात मनी मंगळसूत्र, गंठन, सोन्याची चैन व रोख असा १४ लाख रुपयांचा मुद्देमाल आढळला. पोलिसांनी पंचांसमोर तो जप्त केला. घरात दोघांचीही आई होती आणि 'माझ्या मुलांना सोडा', अशी विनवणी ती करत होती. हे तिघे ताब्यात, तर तिघे फरार– पोलिसांनी लुटमारीच्या प्रकरणात राहुल अनिल काळे (वय १९), विकास अनिल काळे (वय २१), अनिल राम काळे (वय ४०, रा. खामकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिव) या तिघा बापलेकांना ताब्यात घेतले आहे. त्यांचे साथीदार सुनील हिरमण दशांदे, सचिन ऊर्फ आवड्या राम काळे आणि बबलू शिव दशांदे (सर्व रा. मकरवाडी) हे अजूनही फरार आहेत. त्यांचा शोध पोलिस घेत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## कंटेनर–ट्रकचा...

संतुलन बिघडल्याने दोन्ही वाहने समोरासमोर धडकल्याने या झालेल्या भिषण अपघातात टीएस ०७ युएम ७३३४ चा लातुर जिल्ह्यातील चाकुर तालुक्यातील वडवण येथील चालक इमाम पठाण वय ४० वर्षे हे जागीच ठार झाले. त्यांचा मृतदेह क्रेनच्या साहाय्याने तब्बल एक ते दिड तासाने बाहेर काढण्यात आला तर दुसऱ्या वाहनातील चालक जावेद गुलाम चौधरी व फर्मान जावेद पाशा मृदाबाद युपी हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर गेवराईतील उपजिल्हा रुग्णालय उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे. दरम्यान सदर ठिकाणी वाहतूक व्यवस्था ठप्प झाल्याने गेवराई शहरातून वाहतूक व्यवस्था करण्यात आली होती. तर तब्बल तीन तासानंतर ट्राफिक पोलिसांनी गेवराई पोलीस यांच्या वतीने वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. सदरील घटनेचा पंचनामा पोलीस हवालदार सुंदर राठोड यांनी केला आहे घटनेचा अधिक तपास गेवराई पोलीस करत आहे.

## वाल्मिक कराडला...

त्या दिवशी पूर्ण होऊ शकला नव्हता. त्यामुळे न्यायालयाने पुढील सुनावणी १६ डिसेंबर रोजी ठेवली होती. त्यानंतर आज अंतिम निर्णय देत न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज नामंजूर केला. ही सुनावणी न्यायमूर्ती सुशिल एम. घोडेस्वार यांच्या न्यायालयात पार पडली.

संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलिस ठाण्यात वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांविरोधात खून तसेच मकोका कायद्याअंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पासून वाल्मिक कराड कोठडीत आहे. दीर्घकाळ कोठडीत असल्याने आणि आपल्याला जामीन मिळावा यासाठी त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, या प्रकरणातील गुन्ह्याचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे पाहता न्यायालयाने त्याला दिलासा देण्यास नकार दिला आहे. हत्येच्या वेळी कराड शेकडो किलोमीटर दूर असल्याचा दावा– कराडच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ शिरीष गुप्ते यांनी जोरदार युक्तीवाद केला होता. त्यांनी असा दावा केला की, कराडला अटक करताना पोलिसांनी अटकेची कारणे लेखी स्वरूपात दिली नाहीत, त्यामुळे ही अटक बेकायदेशीर ठरते. तसेच, या प्रकरणात मकोका कायदा चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला असून, मकोका लागू करण्यासाठी दिलेली मंजुरीही नियमबाह्य असल्याचा युक्तीवाद करण्यात आला. याशिवाय, संतोष देशमुख यांच्या हत्येच्या वेळी वाल्मिक कराड घटनास्थळापासून शेकडो किलोमीटर दूर असल्याचा दावा करत, त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नसल्याचे सांगण्यात आले. कराडला खोट्या पद्धतीने गोवण्यात आले असून, त्याच्याविरोधात थेट पुरावे नसल्याचा मुद्दा उपस्थित करत जामीन देण्याची मागणी करण्यात आली होती.

ठोस पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज फेटाळला– मात्र, आरोपीच्या वकिलांचे सर्व युक्तीवाद सरकारी पक्षाने ठोस पुराव्यांच्या आधारे खोडून काढले. मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी न्यायालयासमोर देशमुख हत्याकांडाचा संपूर्ण घटनाक्रम मांडला. प्रत्येक टप्प्यावर साक्षीदार उपलब्ध असून, सीडीआर रिपोर्ट, सीसीटीव्ही फुटेज, तसेच आरोपींच्या आपसातील ऑडिओ रेकॉर्डिंग सरकारकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, या सर्व पुराव्यांना पुष्टी देणारे न्यायवैद्यक प्रयोगशाळेचे अहवालही सरकारी पक्षाकडे असल्याचे नमूद करण्यात आले. या ठोस पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज फेटाळत, त्याला कोणतीही सवलत देण्यास स्पष्ट नकार दिला. या निर्णयामुळे देशमुख कुटुंबाला न्याय मिळण्याची आशा अधिक बळावली असून, प्रकरणाचा पुढील तपास आणि न्यायप्रक्रिया वेगाने पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## बाळराजे पवारांचा ...

रात्री बाळराजे पवार यांना अटक करण्यात आली. अटकेनंतर न्यायालयाने त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. दरम्यान आज न्यायालयात हजर केल्यानंतर दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घेत न्यायालयाने बाळराजे पवार यांचा जामीन मंजूर केला. याप्रकरणात ॲड. सानप, ॲड. जयस्वाल व ॲड. अमोल दाभाडे यांनी काम पाहिले.

नगरपालिका निवडणुकीसाठी मतदान सुरू असतांनाच गेवराई येथे २ डिसेंबर रोजी भाजपचे बाळराजे पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या समर्थकांमध्ये मोठा राडा झाला होता. दगडफेक, एकमेकांच्या घरावर, पक्ष कार्यालयावर चाल करून केलेल्या हाणामारीमुळे गेवराईतील वातावरण बिघडले होते. याच प्रकरणात पोलीसांकडून गुन्हा दाखल झाल्यानंतर माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे बंधु व भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार गीता पवार यांचे पती बाळराजे पवार यांना अटक करण्यात आली.

गेवराईतील राडा हा एकमेकांना जीवे मारण्याच्या षडयंत्राचा भाग होता, असा आरोप दोन्ही बाजूंनी करण्यात आला होता. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करत पोलीसी खाक्या दाखवला होता. तसेच हल्लेखोरांना जिल्ह्यातून हद्दपार करण्याची तसेच पोलीस स्वतः फिर्यादी होऊन गुन्हे दाखल करत कारवाई करेल, असे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार गेवराई पोलिसांनी ५० जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले होते. यात बाळराजे पवार यांचाही समावेश होता. सुरवातीला अनेक आरोपींना ताब्यात घेऊन नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, तपासादरम्यान बाळराजे पवार यांच्यावरील आरोपांची व्याप्ती आणि गुन्ह्यातील कलमांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी त्यांना अटक केली.

## 'मला आई व्हायचंय...

बळी पडत आहेत. गेल्या महिनाभरात असे सहा प्रकार उघडकीस आले असून सायबर पोलीस ठाण्यात यासंदर्भात तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर गुन्हेगार सोशल मीडियावर श्रीमंत महिलांचे बनावट प्रोफाइल तयार करतात. त्यानंतर तरुणांना खूप दिवसांपासून अपत्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, मात्र गर्भधारणा होत नाही, मला आई बनायचे आहे', असे भावनिक मेसेज पाठवले जातात. या कामासाठी लाखो रुपयांचे आमिष दाखवले जाते. एकदा तरुण जाळ्यात अडकला की, नोंदणी शुल्क, ओळख पडताळणी, जीएसटी आणि सुरक्षा अनामत रक्कमेच्या नावाखाली त्यांच्याकडून हजारो रुपये उकळले जातात. याशिवाय, निवडीच्या बहाण्याने व्हिडिओ कॉलवर तरुणांना अश्लील चाळे करण्यास सांगून त्याचे चित्रीकरण केले जाते. हे व्हिडिओ नातेवाईकांना पाठवण्याची किंवा व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेलिंगचा प्रकार सुरू होतो. याप्रकरणी वाळूज येथील एका कंपनीत काम करणाऱ्या २६ वर्षीय अकाउंटंट तरुणाची फसवणूक झाली आहे. त्याला 'प्रेग्नन्सी जॉब'साठी ४० हजार रुपये महिना पगार आणि कामाचे २५ लाख रुपये मिळतील असे आमिष दाखवण्यात आले होते. या हव्यासापोटी त्याने नोंदणीसाठी ८ हजार रुपये भरले. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका ग्रामीण भागातील युवकाने टेलिग्रामवरील जाहिरातीला भुलून १५ हजार रुपये गमावले. एका पीडित तरुणाने दिलेल्या माहितीनुसार, फेसबुकवरील जाहिरातीद्वारे तो धर्मेंद्र पटेल आणि ज्योती शर्मा यांच्या संपर्कात आला होता. त्यांनी विविध करणांनी पैसे उकळून नंतर त्याचे नंबर ब्लॉक केले. झारखंडमधील टोळ्या या गुन्ह्यांमध्ये सक्रिय असल्याचे तपासात समोर आले आहे. या गुन्हेगारांविरुद्ध भारतीय दंड संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना कायदेशीर अस्तित्व नसते. सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक भावनांचा गैरफायदा घेणाऱ्या अशा मेसेजेसला नागरिकांनी प्रतिसाद देऊ नये. फसवणूक झाल्यास तत्काळ सायबर पोलिसांशी किंवा १९३० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपायुक्त

◆ पान ४ वरून पुढे...

## राज्यातील महसूल...

चौकशी पूर्ण होईपर्यंत पूर्ववत पदस्थापना , महसूल विभागातील नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी , महसूल सहाय्यक यांच्या वेतनश्रेणी व ग्रेड पे सुधारणे , राज्यातील महसूल सेवक संवर्गाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्यांना तातडीने मंजुरी देणे , तसेच निवडणूक व आपत्ती काळातील कामकाजासाठी संरक्षणात्मक धोरण राबविणे यांचा समावेश आहे . कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता : महासंघाने स्पष्ट केले आहे की , मागण्या मान्य न झाल्यास १९ डिसेंबर २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रात महसूल विभागाचा बेमुदत कामबंद आंदोलनात सहभाग राहील . त्यामुळे जमीन नोंदणी , फेरफार , सातबारा , दाखले , आपत्ती मदत , पिक पाहणी आदी कामकाज ठप्प होण्याची शक्यता असून त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील , असा इशारा देण्यात आला आहे संवादाची मागणी : महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी संघर्ष नको तर संवाद हवा अशी भूमिका घेत शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने तोडगा काढावा , अन्यथा आंदोलन अपरिहार्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे . शासनाने वेळीच सकारात्मक निर्णय घेतल्यास जनतेचे हित आणि प्रशासनाची विश्वासार्हता अबाधित राहील , अशी अपेक्षाही महासंघाने व्यक्त केली आहे . निवेदन देताना अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपजिल्हाधिकारी मनोज घोडे , कविता जाधव , शिवकुमार स्वामी , प्रभोदय मुळे , शैलेश सूर्यवंशी , तहसीलदार चंद्रकांत शेळके , डी सी मेंडके , नरेंद्र कुलकर्णी , विनोद रणनवरे , विलास तरंगे , राकेश गिड्डे नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व विविध संघटनेचे पदाधिकारी यात महादेव चौरे , पुरुषोत्तम आंधळे , अरविंद राऊत आदी उपस्थित होते .

## पिंपळनेर परिसरात...

हिरवा व काळा मावा प्रादुर्भावाने डाळिंबबागा रोगग्रस्त झाल्याचे डाळिंब उत्पादक शेतकरी राम जाधव यांनी सांगितले. हवामान खात्याच्या अंदाजानुसार अनखिन आठवडाभर तरी थंडीचा कडाका कायम राहणार आहे. परिणामी, शेतकऱ्यांना औषध फवारणीवर मोठा खर्च करावा लागणार आहे. आधीच शेतकरी शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नसल्याने मेटाकुटीला आला आहे. त्यात रासायनिक औषधांसाठी मोठा खर्चाचा भार उचलावा लागत असल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले.

## श्रृंगेरीदेवीकडे जाणाऱ्या...

याबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. नव्याने रस्ता झाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांतच पुन्हा खड्डे पडतात. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असून केवळ तात्पुरत्या स्वरूपात डागडुजी केली जाते; मात्र काही दिवसांतच रस्त्यांची अवस्था पूर्ववत होते, अशीही माहिती निवेदनात देण्यात आली आहे. आगामी यात्रेच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्यांची पाहणी करून सर्व खड्डे भरावेत, वाहून गेलेल्या साईडपट्ट्या दुरुस्त कराव्यात व सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत येत्या दोन दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास ग्रामस्थासह आंदोलन छेडण्याचा इशाराही सामाजिक कार्यकर्ते अशोक पोकळे यांनी दिला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## नगरपालिका व...

वसीम शेख विनायक गाडे, मोहन बनसोडे पोलीस ड्रायव्हर चालक नारायण वाघमारे पोलीस हवलदार चालक संतोष हारके पोलीस कर्मचारी अजिनाथ तसेच नगरपालिका अतिक्रमण प्रमुख मुन्ना गायकवाड, पवण लाहोट, सुजित जाधव लखन तुसाबड किरण भिसे अविनाश डु लगच विकी गागट इत्यादींनी सहभाग नोंदवला. आज दि. १७/१२/२०२५ रोजी बशीरगंज, राजुरीवेस, कारंजा, बलभीम चौक जुना बाजार येथे बीड नगरपालिका व जिल्हा वाहतूक शाखेचे संयुक्त विद्यमाने हि कारवाई केली.

## गहाळ मोबाईल...

आजतागायत परत करण्यात आलेला नाही. डॉ. ढवळे यांच्यावर तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या तक्रारीवरून गुन्हा क्रमांक ०२१०/२०२०, भा.दं.वि. कलम ५०५(२), १८८ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाला ॲड. महेश भोसले यांच्यामार्फत उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. गुन्हा रद्द होऊनही वारंवार प्रत्यक्ष भेटी, लेखी निवेदने देऊनसुद्धा मोबाईल परत न मिळाल्याने डॉ. ढवळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जर पोलिस प्रशासन गहाळ झालेले मोबाईल शोधून नागरिकांना सन्मानपूर्वक परत देत असेल, तर पोलिस स्टेशनमध्ये कायदेशीररीत्या जप्त केलेला मोबाईल परत देण्यास अडचण काय? असा थेट सवाल त्यांनी पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांना केला आहे.

## अतिक्रमण धारकांना...

गाव तलाव संरक्षण भिंती लगट अनेक व्यापारी आणि नागरिकांनी तलाव भिंत कोरून अतिक्रमण केले असून भर पावसाळ्यात या ठिकाणच्या दुकान आणि घरामध्ये पाझर येऊन घरे, दुकान पडून जीवित आणि वित्त हानी होण्याची भीती समोर येथे. तसेच या ठिकाणच्या अतिक्रमण धारकांनी केलेल्या अतिक्रमणामुळे गाव तलावाची भिंत फुटण्याचा धोका निर्माण होत असल्याने सदरील अतिक्रमण काढण्यात यावे अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोद्दीन आणि त्यांचे सहकारी पदाधिकारी यांनी केलेली आहे. त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने ग्रामपंचायत प्रशासनाने या अतिक्रमण धारकांना दोन नोटीस देऊन अतिक्रमण काढून घेण्या संदर्भात सूचना करून वरिष्ठ कार्यालयास कळवले आहे परंतु तिसरी आणि अंतिम नोटीस त्यांना अद्याप देण्यात आली नसल्याने ग्रामपंचायत चे ग्रामसेवक आणि प्रशासक यांचा कारभार शंका निर्माण करत असून याबाबत अनेक वेळा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने भूमिका घेऊन सांगण्यात आले यावर आम्ही कायदेशीर नोटीस देऊन आमचे काम करण्यात येईल असे अधिकारी यांच्या कडून सांगण्यात येते परंतु कर्मचारी यांनी अनेक वेळा दिशाभूल करत प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना गावच्या जनतेच्या आणि तक्रारदाराच्या डोळ्यावर आणले आहे.आता मुख्य कार्यकारी अधिकारी बीड हे काय कार्यवाही करतात याकडे लक्ष लागले असून जर कार्यवाही झाली नाही तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगने, बाळू डहाळे, सुनिता भाभी गील यांनी दिला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## अर्थसहाय्यातून होणार...

गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना –ण स्मॉल फायनान्स बँकेच्या सहकार्यातून आर्थिक सहाय्य केले जात आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथील १३ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना थेट गावात जाऊन आर्थिक सहाय्याचे वितरण करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. बुधवार, दि.१७ डिसेंबर रोजी गावातील हनुमान मंदिर येथे सदरील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फळबाग लागवड करून हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावलेले असून त्यांच्या आर्थिक स्थितीत अमूलाग्र बदल झालेले आहेत. यापुढे ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमांतून गावगावात शेतीचा शाश्वत विकास घडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार असून त्या संपूर्ण गावांचा कायापालट करण्याचा आपला संकल्प असल्याचे जलनायक मयंक गांधी यांनी म्हटले आहे. पठाण मांडवा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. याबाबत सविस्तर असे की, ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश असून, शेतकऱ्यांना लागणारे मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य संस्थेकडून मोफत उपलब्ध करून देण्यात येते. चार हजार गावांतील जवळपास तीस हजार शेतकरी संस्थेसोबत जोडले गेलेले आहेत. टाटा सामाजिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दहा पटीने वाढल्याचे दिसून आलेले आहे. कापूस, सोयाबीन आणि तत्सम पिकांच्या आधारावर शेतकरी जगूच शकत नाही. शेतीची पारंपरिक पद्धती बदलून आधुनिक शेतीच्या सहाय्याने आर्थिक उत्पन्नात वाढ होऊ शकते, मात्र त्यासाठीही सुरुवातीला पैशांची अडचण येते. आर्थिक संकटातील शेतकऱ्यांसाठी पैशांशिवाय हा नवा बदल करणे अशक्य असल्याची बाब लक्षात घेता ग्लोबल विकास ट्रस्ट आणि –ण स्मॉल फायनान्स बँकेच्या संयुक्त विद्यमाने गरजू पात्र शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्यात येत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मांडवा पठाण गावातून या उपक्रमाचा बुधवारी शुभारंभ करण्यात आला. पठाण मांडवा गावातील एकूण ६८ शेतकऱ्यांनी आवेदन केले होते त्यापैकी आज पहिल्या दिवशी १३ पात्र शेतकऱ्यांना नव्याने फळबाग लागवडीसाठी प्रति शेतकरी एकरी १ लाख २० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. –ण बँकेचे विभागीय अधिकारी दिलीप जीवने, स्वप्निल राडीकर, नागनाथ मुंडे, संदीप बाबर, केशव गव्हाणे, विशाल राठोड आदींनी उपस्थित राहून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी मदत केली.

## पीक पाहणी...

स्वतंत्र कालावधी निश्चित करण्यात आला आहे. शासन निर्देशानुसार शेतकरी स्तरावरील ई–पीक पाहणीसाठी कालावधी दिनांक २० डिसेंबर २०२४ ते २४ जानेवारी २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत शेतकऱ्यांनी स्वतः किंवा सहाय्यक यंत्रणेच्या मदतीने आपल्या पिकांची अचूक नोंद करणे अपेक्षित आहे. त्यानंतर सहाय्यक स्तरावरील म्हणजेच महसूल , कृषी आणि ग्रामविकास विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी कालावधी दिनांक २५ जानेवारी २०२५ ते २० मार्च २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत १०० टक्के ई–पीक पाहणी पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच सर्व तहसीलदार यांनी संयुक्तपणे आढावा घेतला. राज्यात एकूण झालेल्या ई–पीक पाहणीचा विचार करता बीड जिल्ह्याचा सध्या चौदावा क्रमांक असून , हा क्रमांक अधिक सुधारण्यासाठी महसूल विभाग पूर्ण क्षमतेने काम करीत आहे. ॲग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणे अत्यंत आवश्यक असून , भविष्यातील सर्व शासकीय लाभ थेट फार्मर आयडी आणि ई–पीक पाहणीशी जोडले जाणार आहेत. ही बाब लक्षात घेऊन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्पष्ट आदेश काढत महसूल यंत्रणेला अधिक सक्रिय करण्याचे निर्देश दिले. नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी , ग्राम महसूल सेवक यांनी गावोगावी प्रत्यक्ष फिरून ई–पीक पाहणी पूर्ण करावी असे आदेश देण्यात आले. या आवाहनाला प्रतिसाद देत महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी थेट शेतशिवारात उतरत असून , शेतकऱ्यांशी संवाद साधत पीक पाहणी , फार्मर आयडी नोंदणी आणि ॲग्रीस्टॅक माहिती संकलनाची कामे सुरू आहेत. गावागावात तलाठी , ग्राम महसूल सेवक आणि मंडळ अधिकारी प्रत्यक्ष भेटी देत शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत असतात. या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले की , ई–पीक पाहणी ही केवळ सरकारी औपचारिकता नसून शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारी प्रक्रिया आहे.

## शेतकऱ्यांचे कैवारी...

यापुढे शेतकऱ्यांचे हित जोपासावा यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी अथक प्रयत्न केले. साखर आयुक्त, सहकार मंत्रालय व केंद्रीय सहकार मंत्रालय यांनी महेश (कडा) सहकारी साखर कारखान्याचे लायसन रद्द केले असताना ते पुन्हा पुनर्जिवित व्हावे यासाठी लोकशाही पद्धतीने मतदार संघाचे शेतकऱ्यांचे नेते माजी आ. भीमराव धोंडे यांनी आंदोलन करून साखर आयुक्त व राज्य सरकार, केंद्रसरकारचे लक्ष वेधले. त्यांच्या या लढ्याला यश आले आहे.ज्यांनी या प्रकरणी माजी आ. धोंडे यांच्या सोबत खंबीर साथ दिली त्याचे आभार मानले. यापुढे या मतदार संघात शेतकरी, कामगार यांचे हित जोपासण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली माजी आ. भीमराव धोंडे हे ताकदीने काम करणार आहेत. महेश(कडा) कारखाना सुरू होणार हे निश्चित झाल्याने शेतकरी बांधव आनंदीत झाले आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडकाचे भव्य-दिव्य आयोजन

## सांस्कृतिक परंपरेला नवा आयाम देणाऱ्या चंपावती महोत्सवाचे होणार महाकुंभात रूपांतर!




बीड । प्रतिनिधी

बीडच्या सांस्कृतिक वैभवाला नवा उन्मेष देणारा चंपावती महोत्सव यावर्षी अधिक व्यापक आणि आकर्षक रूपात साजरा होणार असून कलाकार, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त गतवर्षीप्रमाणे याही वर्षी बीडमध्ये आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्याच्या सांस्कृतिक परंपरेला नवा आयाम देणाऱ्या या महोत्सवाने बीडचे सांस्कृतिक क्षेत्रातले मानबिंदू स्थान पुन्हा उजळून निघाले आहे. कलेचा महाकुंभ ठरणाऱ्या या महोत्सवात यावर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरात कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या बीडची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी आणि नव्या पिढीतील कलागुणांना वाव देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा मानला जातो. चंपावती महोत्सव जानेवारी महिन्यात आयोजित करण्यात येणार असून स्पर्धांचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल, अशी माहिती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली. गतवर्षी चंपावती महोत्सवाला जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील शेकडो शाळांमधून तब्बल १४ हजार सात बाल कलाकारांनी सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करून त्यांच्या कला-अभिव्यक्तीसाठी मोठा मंच उपलब्ध करून देणारा हा महोत्सव दरवर्षी आयोजित व्हावा, अशी मागणी जिल्हाभरातून होत होती. याच पार्श्वभूमीवर यावर्षी पुन्हा एकदा महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सर्वोत्कृष्ट शाळेस मिळणार महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक! या वर्षीच्या महोत्सवात समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, एकपात्री अभिनय, गीतगायन, चित्रकला, फॅमिली डान्स, वक्तृत्व आणि रांगोळी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात येणार असून सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याशिवाय सर्व स्पर्धांमध्ये सर्वाधिक बक्षिसे मिळवणाऱ्या शाळेला 'महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक-बेस्ट स्कूल ऑफ द इयर चॅम्पियनशिप' बहाल करण्यात येणार आहे. त्यामुळे शाळांमध्ये या करंडकासाठी प्रबळ स्पर्धा पाहायला मिळणार आहे.



# शेजारील जिल्ह्यातील तालुके झपाट्याने बदलत असताना पाटोदा शहर मात्र अजूनही मूलभूत सुविधांसाठी झगडते : गणेश शेवाळे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहराचा विकास रखडलेला; मूलभूत सुविधांअभावी नागरिकांमध्ये असंतोष पाटोदा तालुका व शहराचा विकास आजही अपेक्षेप्रमाणे झालेला दिसत नाही. शेजारील जिल्ह्यातील तालुके झपाट्याने बदलत असताना पाटोदा शहर मात्र अजूनही मूलभूत सुविधांसाठी झगडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. पाटोदा शहरातील चौक-चौकात महामानवांचे पुतळे, चौकांचे सुशोभीकरण अद्याप झालेले नाही. इतर शहरांमध्ये विकासाच्या नावाखाली चौक सुशोभीकरण, सांस्कृतिक ओळख जपली जात असताना पाटोदा शहर या बाबतीत मागे असल्याचे स्पष्ट होते.पाटोदा बाजारपेठेजवळील मांजरा नदीकाठी सुसज्ज व सुरक्षित नदीघाटाची सुविधा आजही उपलब्ध नाही. त्यामुळे



धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न कायम आहे.शहरातील बहुतांश रस्त्यांची अवस्था खराब असून खड्डे व धुळीमुळे वाहनचालकांसह नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ शौचालयांचा अभाव असूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत. पाटोदा शहरातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागत आहे. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक व युवकांसाठी चालण्याचे ट्रॅक, खुली जिम यांसारख्या आरोग्यविषयक सुविधांचाही अभाव आहे.

शहरात नळजोडण्या व पाणीपुरवठा योजना असतानाही नागरिकांना स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी नियमितपणे मिळत नसल्याचे वास्तव आहे. कोणालाही विरोध नसून केवळ आपल्या शहराचा विकास व्हावा, हीच नागरिकांची अपेक्षा आहे. मात्र पाटोदा शहराचा विकास नेमका का थांबला आहे, असा सवाल सुज्ञ नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. पाटोदा तालुका व शहराच्या विकास प्रश्नांवर प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने ठोस आणि जबाबदार भूमिका घ्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश शेवाळे यांनी केली आहे.

# द्वारका अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीच्या दिनदर्शिकेचे विमोचन



माजलगाव । प्रतिनिधी

मैत्रीपूर्ण आणि विश्वास पात्र हमी या विचाराने स्थापन झालेल्या द्वारका अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटी या संस्थेच्या दिनदर्शिकेचे विमोचन १६डिसेंबर रोजी संस्थेच्या मुख्य कार्यालयात करण्यात आला. द्वारका अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी या दिनदर्शिकेचे हे ७ वे वर्ष असून बचतीची माहिती व विविध उपक्रम या दिनदर्शिकेच्या माध्यमातून नागरिकांपर्यत पोहोचविण्याचे काम केले जाते. दर वर्षी ५००० दिनदर्शिका नागरिकांना मोफत घरपोच दिल्या जातात. या दिनदर्शिकेत सर्व सण -उत्सव, जागतिक दिन, थोर महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी, परिसरातील महत्वाचे संपर्क क्रमांक, परिसरातील नवउद्योजक-व्यावसायिक यांच्या जाहिराती अशी बहुउपयोगी दिनदर्शिका द्वारका अर्बन या संस्थेच्या वतीने दरवर्षी प्रसिद्ध करण्यात येते २०२६या वर्षीच्या दिनदर्शिकेच्या विमोचन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिगंबर माणिकराव सोळंके, खरेदी विक्री संघाचे संचालक महेश सोळंके, विकास एरंडे, कृष्णा सुकरे, पेंटर पंकज साळवे, सुनील उदावंत,अशोक सोळंके, संस्थेचे शाखा व्यवस्थापक सदाशिव सोळंके यांच्या सह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते होते.

# संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप



बीड । प्रतिनिधी

संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज सामाजिक प्रतिष्ठान व संत संताजी जगनाडे महाराज क्रीडामंडळ, रविवार पेठ, तेली गल्ली, बीड यांच्या वतीने बुधवार दि. १७ डिसेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी रविवार पेठ, तेली गल्ली येथे श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा कार्यक्रम श्रद्धा व उत्साहात पार पडला. तसेच जि. प. प्राथमिक शाळा, पांगरबावडी येथेही पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास जि. प. प्राथमिक शाळा पांगरबावडीचे शिक्षक व कर्मचारीवर्ग तसेच संस्थेचे मान्यवर चंद्रकांत वामने, गणेश पवार, शिवाजी झांबरे, राजू चेके, दिलीप मुळे, मनोज क्षीरसागर, अंकुश शेनकुडे, हर्षद क्षीरसागर, नंदकिशोर पवार, दीपक क्षीरसागर, अनंत गोरे यांच्यासह समस्त तेली समाज बांधव व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमादरम्यान शिक्षक व मान्यवरांनी संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी, शिक्षणाचे महत्त्व व संस्कारांचे महत्त्व याबाबत बहुमूल्य मार्गदर्शन केले.

# ईगलवुड इंग्लिश स्कूल येथे क्रीडा सप्ताह व हेमंत शिबिराचा उत्साहात शुभारंभ संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

ईगलवुड इंग्लिश स्कूल माजलगाव या शाळेत क्रीडा सप्ताह तसेच हेमंत शिबिराचा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पवार हॉस्पिटलपासून मशाल दौडीचे आयोजन करण्यात आले होते. या मशाल दौडीमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयी उत्साह व शिस्तीची भावना निर्माण झाली.

शालेय मंचावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आकर्षक मार्चपास्ट तसेच कवायतीचे विविध प्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावर्षीचा क्रीडा सप्ताह



भारतीय महिला क्रिकेट संघाला समर्पित करण्यात आला असून, महिलांच्या क्रीडा क्षेत्रातील यशाचा गौरव करण्याचा उद्देश यामागे होता. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून ड.दीपक देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून दै.कार्यारंभ वर्तमानपत्राचे पत्रकार श्री.वैजनाथ घायतिडक उपस्थित होते. तसेच संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, संस्थेचे सचिव डॉ.शरद पवार, शाळेचे प्राचार्य सत्यजित सर व उपप्राचार्या प्रणिता मॅडम यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याचे कौतुक केले आणि अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासातच नव्हे तर क्रीडा व शिस्तीच्या बाबतीतही उत्कृष्ट कामगिरी करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.तसेच या कार्यक्रमास अभूतपूर्व सोहळा असे संबोधले. डॉ.अर्चना पवार मॅडम यांनी या तीन दिवस चालणाऱ्या क्रीडा सप्ताह तथा हेमंत शिबिराची घोषणा केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सत्यजित सरांनी केला. तसेच सूत्रसंचालन वरद काळे आणि शेख आहाद या विध्यार्थ्यांनी केले. हा सोहळा यशस्वी होण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# बीड जि.प.व.पं.स.निवडणुका ताकदीने लढण्यासाठी सज्ज व्हावे : शेख मुजीब

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर व शिवसेना नेते तथा संपर्कनेते अंबादास दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड तालुक्यातील जि.प.व पं.स. निवडणुकीत घवघवीत यश संपादन करण्यासाठी शिवसेना अहिल्यानगरचे माजी जिल्हाप्रमुख शेख मुजीब भाई यांची बीड विधानसभा संपर्कप्रमुख पदी निवड केली आहे. तरी आगामी जि प व पं स. ताकतीने लढण्यासाठी शिवसैनिक व नागरिकांनी सज्ज व्हावे असे आवाहन संपर्कप्रमुख शेख मुजीब यांनी केले. बीड तालुक्यातील विविध गावांमध्ये जाऊन मुजीब भाई व जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे,शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंधन युवासेना उपजिल्हा अधिकारी अशफाक शेख यांनी गावकरी व शिवसैनिकांना उद्धवजी ठाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची विनंती केली व अडीअडचणी समजावून घेतल्या, यावेळी बोलताना शेख मुजीब भाई म्हणाले की पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्याकडे बीड विधानसभा मतदारसंघ बांधण्यासाठी जबाबदारी दिलेली आहे. हि जबाबदारी पार पाडण्यासाठी मला तुमची गरज आहे. बीड मतदारसंघातून तुमच्यासारख्या कडवट व निष्ठावंत शिवसैनिकांमुळे तीन वेळा शिवसेनेचाच आमदार निवडून आलेला आहे. हा पुर्वीचाच बालेकिल्ला आहे तो पुन्हा नव्याने बांधुन आपल्याला मजबूत करायचा आहे.




## DECLARATION

I DECLARE BY This PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

OLD NAME

**SIDDIQI SURAYA SULTANA KAZI RAFATTULA**

NEW NAME

**SIDDIQUI SURAIYYA AHEMAD RAYEESUDDIN**

ADD- 145 KB POWER House At Chinchgavaon Majalgaon Dist BEED 431131 MS.

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (व .स्तर) बीड यांचे न्यायलयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. १६१० /२०२५**

अर्जदार:- १) बाबुराव पि.बाजीराव वरपे, वय-७६ वर्षे,धंदा-शेती, रा.कुटेवाडी ता.जि.बीड, २) तुकाराम पि.बाबुराव वरपे, वय-५१ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

(अर्जदार हे भारतीय रहिवाशी आहेत)

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे मुक्ताबाई भ्र.बाबुराव वरपे, रा.कुटेवाडी ता.जि.बीड या दिनांक १५-०७-२०२४ रोजी कुटेवाडी ता.जि.बीड येथे मयत झालेल्या असुन अर्जदार क्रं. १ हे मयताचे पती आहेत.तसेच अर्जदार क्रं. २ हा मयताचा मुलगा आहे.२) हे की,अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०४/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीख:- ०६/०१/२०२५

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :- १२६७ / २०२५**

अर्जदार :-१. मंगल प्रभाकर आराक, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. विवेकानंद शाळेजवळ, धानोरा रोड, बीड, ता.जि.बीड, २. सुरेंद्र प्रभाकर आराक, वय ४३ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ३. जितेंद्र प्रभाकर आराक, वय ४० वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ४. स्नेहल विजेंद्र आराक, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ५. प्रियंका प्रभाकर आराक ( विवाहापुर्वीचे नाव ) प्रियंका राहुल वानखेडे ( विवाहानंतरचे नाव ). वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. विवेकानंद शाळेजवळ, धानोरा रोड, बीड, ता.जि.बीड, ह.मु. छत्रपती संभाजीनगर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर,

विरुरुद निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे राहिबाई जनार्धन आराक हया दिनांक ३०/०४/२०१३ रोजी महात्मा फुले नगर, पिर बाजार, दर्गा रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन आहे. अर्जदार क २ व ३ हे मयताचे नातु आहेत. तसेच अर्जदार क ४ ही मयताची नातसुन आहे. अर्जदार क ५ ही मयताची विवाहित नात आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २०/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:- १८/१२/२०२५.

( मार्फत विधिज्ञ:- ॲड डी एम रोटे )

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १० वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १८६४/२०२५**
**कासाबाई विरूद्ध निरंक**

अर्जदार :- १) कासाबाई अच्युतराव घोरड, वय ७५. धंदा घरकाम रा. ब्रम्हगांव, ता. जि. बीड, २) लक्ष्मण अच्युतराव घोरड, वय ५०, धंदा घरकाम रा. तुळजाई मोटार डायव्हींग स्कुल, जालना रोड ता. जि. बीड, (३) आशालता सुरेशराव जाधव, वय ४६. धंदा घरकाम रा. बाहेगव्हाण ता. जि. बीड (४) उषा प्रल्हाद आहेर, वय ४५, धंदा घरकाम रा. उमरद जहाँगिर, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अच्युत रामभाउ घोरड, रा. ब्रम्हगांव, ता. जि.बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत अच्युत रामभाउ घोरड, रा. ब्रम्हगांव ता. जि. बीड यांचा मृत्यु दि. ०४/१०/२०२५ रोजी मौज, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ मयताचा मुलगा असून अर्जदार क. ३ व ४ ही मयताच्या विवाहीत मुली आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अच्युत रामभाउ घोरड, रा. ब्रम्हगांव ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६ माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १९ जानेवारी २०२६.

(ॲड. एस. बी. नांदे यांच्यामार्फत)

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) स.अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

**श्रीमती पी.व्ही. चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर केज यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ४६१/२०२५, नि.क. २०/ड**
**रुक्मिन विरुध्द निरंक**

विठ्ठल पि. किसन विश्वासे मौजे सुर्डी, ता. केज जि. बीड हे दिनांक २२ माई १२ सन २०२४ रोजी मौजे सुर्डी, ता. केज, जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोसद विठ्ठल पि. किसन विश्वास मौजे सुर्डी, ता. केज. जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ श्री. एम. ए. गडकर यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार- १. रुक्मिन भ्र. विठ्ठल विश्वासे, वय ७५ वर्षे धंदा- घरकाम रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. २.सदाशिव पि. विठ्ठलराव विश्वासे, वय- ३९ वर्षे धंदा शेती. रा. सुर्डी ता. केज जि. बीड. ३.गणेश पि. विठ्ठल विश्वासे, वय- २९ वर्षे, धंदा- शेती रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. ४.सुवर्णा भ्र. बाळासाहेब कोळी, वय- ५० वर्षेधंदा- घरकाम रा. खामसवाडी ता. जि. धाराशिव, ५. उर्मिला भ्र. राजेनाऊ यशवंत वय- ३६ वर्षे. धंदा घरकामरा. देवळा, ता. वडवणी जि. बीड. ६. राधिका भ्र. शरद कोळी, वय- ३८ वर्षे. धंदा- घरकाम रा. माटेफळ जि. लातूर, ७. सिता पि. विठ्ठल विश्वासे, वय- ३५ वर्षे. धंदा घरकाम रा. सुर्डी ता. केज जि. बीड. ८.अहिल्या भ्र. किसन कोळी, वय- ३४ वर्षे, धंदा- घरकाम रा. इंदापुर ता. वाशी जि. धाराशिव ९.भाग्यश्री पि. विठ्ठलराव विश्वासे, वय- ३१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. १०. पुजा पि. विठ्ठल विश्वासे, वय- २७ वर्षे, धंदा- घरकाम रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. ११. सिमा पि. विठ्ठल विश्वासे, वय- २४ वर्षे,धंदा- घरकाम रा. सुर्डी, ता. केज जि. बीड.

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु विठ्ठल पि. किसन विश्वासे, मौजे सुर्डी, ता. केज. जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १५ माहे ११ सन २०२५.

पु.ता. १८/१२/२०२५

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) स.अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर केज

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. १८ डिसेंबर २०२५ ● पान ४

# राज्यातील महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांचा अन्यायाविरोधात एल्गार

## १९ डिसेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघ , जिल्हा शाखा बीड यांच्या वतीने महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या एकतर्फी , अन्यायकारक निलंबन कारवाई , विभागातील प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्या , तसेच नैसर्गिक आपत्ती व निवडणूक काळातील अतिरक्त कामकाज असूनही संरक्षण न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर १९ डिसेंबर २०२५ पासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे . यासंदर्भातील निवेदन आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना देण्यात आले .

निवेदन सादर , तीव्र नाराजी व्यक्त : जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत शासनाकडे आपली भूमिका ठामपणे मांडली . महसूल विभाग हा राज्य प्रशासनाचा कणा असून सामान्य जनतेशी थेट संपर्क असलेला विभाग आहे . मात्र अलिकडच्या काळात केवळ महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच जबाबदार धरून निलंबन , फौजदारी कारवाई व चौकशीचे सत्र सुरू असल्याने विभागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे , अशी तीव्र भावना व्यक्त करण्यात आली .

निलंबन सत्राला विरोध : निवेदनात नमूद करण्यात आले आहे की , महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन , वाहतूक व चोरी रोखण्याची जबाबदारी केवळ महसूल विभागाची नसून पोलीस व परिवहन विभागाचीही संयुक्त जबाबदारी आहे . मात्र प्रत्यक्षात कारवाई होताना सर्व दोष महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर टाकले जात आहेत . परिणामी न्यायालयीन निर्देश , नैसर्गिक न्यायाची तत्त्वे व प्रशासकीय नियम डावलून एकतर्फी निलंबने केली जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे .

प्रमुख मागण्या स्पष्ट : महासंघाने शासनासमोर प्रमुख मागण्या मांडल्या आहेत . त्यामध्ये १२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निलंबन आदेशांचा पुनर्विचार व रद्दबातल निर्णय , ▶▶ उर्वरित पान २ वर




### थोडक्यात

## चिंचोली माळी येथे गलांडे यांचे बेमुदत आमरण उपोषण सुरू

**केज । प्रतिनिधी**

चिंचोली माळी ता.केज येथे विविध प्रलंबित नागरी व शासकीय मागण्यांच्या पूर्ततेसाठी रोहन गलांडे यांनी बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७-३० वाजता संत नामदेव महाराज मंदिर येथे ते उपोषणास बसले आहेत. चिंचोली माळी येथील उर्वरित अतिक्रमण तात्काळ हटवून छत्रपती संभाजी महाराज चौक (नागबेट वस्ती) ते संत नामदेव महाराज मंदिरा पर्यंत रस्ता व नालीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे,अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे.तसेच केज तालुक्यातील विहीर, गायगोठा व घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावेत,अशी मागणीही उपोषणातून करण्यात आली आहे.यासोबतच चिंचोली माळी ग्रामपंचायत हद्दीतील नामदेव महाराज परिसरातील अतिक्रमण हटविणे, येथील कर्मवीर विद्यालयाच्या २००५ ते २०२५ या कालावधीतील निवेदनांवरील मागण्यांची चौकशी करून कार्यवाही करणे,प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या व नव्या इमारतींच्या बांधकाम व पुनर्विकासासाठी २०१५ ते २०२५ या कालावधीत प्राप्त व खर्च झालेल्या निधीची माहिती देऊन चौकशी करणे, महाडीबीटी अनुदानाचे प्रलंबित लाभ शेतकऱ्यांना तात्काळ देणे,गायरान परिसरातील सौरऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. दि.११ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे सादर केलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात, तसेच चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, या मागण्यांसाठीच हे आमरण उपोषण सुरू करण्यात आल्याचे रोहन गलांडे यांनी सांगितले आहे.मागण्या मान्य होई पर्यंत उपोषण सुरूच राहील,असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

## पिंपळनेर परिसरात पिकांची वाढ थांबली

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

गेल्या आठ दिवसांपासून थंडीचा कडाका कमालीचा वाढला आहे. रात्री तापमान निचांकी पातळीवर येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडील पाळीव प्राण्यांबरोबरच शेतातील उभ्या पिकांवर थंडीचा अनिष्ट परिणाम होत आहे. पिंपळनेर येथील शेतकरी रामा केकान यांनी वाढत्या थंडीचा पिकांवर होणाऱ्या परिणामांबद्दल सांगितले की, मी शेतात मका पीक घेतले आहे. परंतु, वाढत्या थंडीमुळे पिकांची वाढ थांबल्याचे स्पष्ट जाणवत आहे. इतर पिकांच्या वाढीवर देखील थंडीचा परिणाम दिसून येत आहे. याशिवाय पिकांवर मोठ्या प्रमाणात किडीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. मिरची, वेलवर्गीय पिके यांचे शेंडे मावा किडीमुळे खाल्ले जात आहेत. परिणामी, या पिकांची वाढ थांबली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्रृंगेरीदेवीकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरावस्था ; दुरुस्तीची मागणी, अन्यथा आंदोलनाचा इशारा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरापासून पासुन अवघ्या १०किमी अंतरावरील श्रृंगेरीदेवी हे प्रसिद्ध तिर्थक्षेत्र आहे. आष्टी ते श्रृंगेरीदेवी व मुगगाव ते श्रृंगेरीदेवी हे दोन्ही प्रमुख रस्ते गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत असून त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अशोक पोकळे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी दि. १७ डिसेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग



क्रमांक २ आष्टी येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे. तालुक्यातील सर्वात मोठा यात्रा उत्सव ब्रम्हगाव येथील श्रृंगेरीदेवीचा असून पौष पौर्णिमेला हा उत्सव सुरू होत असतो. यावर्षी दि. ५ जानेवारीपासून यात्रेला सुरुवात होणार आहे. अमावस्येपर्यंत सलग १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेदरम्यान आष्टी, पाटोदा तालुक्यांसह राज्यभरातून लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी दाखल होतात. रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे भाविक व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आष्टी व मुगगावकडून श्रृंगेरीदेवीकडे जाणाऱ्या मार्गांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत, साईडपट्ट्या पूर्णपणे वाहून गेल्या आहेत. त्यामुळे दुचाकी, चारचाकी तसेच पायी जाणाऱ्या भाविकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. आष्टी-मुगगाव हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी व कंत्राटदारांसाठी चराईचे कुरण ठरत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## नगरपालिका व जिल्हा वाहतूक शाखेचे अतिक्रमण धारकावर कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका व जिल्हा वाहतूक शाखेचे संयुक्त विद्यमाने, नगर नाका, नगर रोड, राजीव गांधी चौक अंबिका चौक असे रस्त्यावर अडथळा आणणारे बोर्ड हादगाडे यावर कारवाई करण्यात आली. अंदाजे ५० ते ६० अतिक्रमणे काढण्यात आली. ही कारवाई जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर सोबत पोलीस हवालदार राहुल गायकवाड पोलीस अंमलदार ▶▶ उर्वरित पान २ वर

## गहाळ मोबाईल शोधणारे बीड पोलिस; मात्र ५ वर्षांपासून जप्त मोबाईल परत देण्यास असमर्थ!

**● डॉ. गणेश ढवळे यांचा पोलिस प्रशासनाला जाहीर सवाल**

**बीड । प्रतिनिधी**

पोलिसांची सतर्कता, नागरीकांचा विश्वास असा ब्रीदवाक्य वापरत गहाळ मोबाईल शोधून पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांच्या हस्ते नागरिकांना मोबाईल परत देतानाचे फोटो 'बीड पोलिस'च्या अधिकृत फेसबुक पेजवर व विविध दैनिकांत झळकत असताना, याच बीड पोलिस



प्रशासनाने सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांचा तपासासाठी जप्त केलेला मोबाईल तब्बल पाच वर्षे उलटूनही परत दिलेला नाही, असा गंभीर आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे.

कोरोना कालावधीत बीड जिल्हा रुग्णालयातील अनियमितता व कथित गैरव्यवहार उघडकीस आणल्याने सूडबुद्धीने गुन्हा दाखल करण्यात आल्याचे नमूद करत औरंगाबाद खंडपीठाने हा गुन्हा दि. २७ जुलै २०२३ रोजी रद्द केला. मात्र, त्या गुन्ह्याच्या तपासासाठी दि. ०९.०९.२०२० रोजी बीड शहर पोलिस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक गजानन जाधव यांनी जप्त केलेला मोबाईल ▶▶ उर्वरित पान २ वर

## अतिक्रमण धारकांना नोटीस देण्यास प्रशासक, ग्रामसेवकांची टाळाटाळ

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर आंदोलनाच्या तयारीत**

**२६ जानेवारी २०२६ ला जलसमाधी घेणार स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांनी दिला इशारा**

**तलवाडा । प्रतिनिधी**



गाव तलाव संरक्षण भिंती लगत झालेले अतिक्रमण काढण्यात यावे यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर आणि पदाधिकारी यांनी पुढाकार घेऊन कार्यवाही करण्यात यावी यासाठी पुढाकार घेऊन ग्रामपंचायत प्रशासनाने कार्यवाही करावी अशी मागणी केली होती. परंतु याकडे ग्रामपंचायत चे ग्रामसेवक आणि सरपंच/प्रशासक यांनी चालढकल पना करत वेळ मारून नेत शेख खिजर भाई यांची मनधरणी करून पहिली आणि दुसरी नोटीस देऊन वेळ मारून नेली परंतु तिसरी अंतिम नोटीस देण्यास गेल्या कित्येक दिवसापासून टाळाटाळ करण्यात येत आल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी बीड तसेच विभागीय आयुक्त,आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर याठिकाणी निवेदन देवून कार्यवाही करण्याची मागणी केली असून त्या अनुषंगाने आयुक्त यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना कार्यवाही करण्या संदर्भात पत्र आले आहे.तरीही प्रशासन ठोस पावले उचलत नसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगने,बाळू डहाळे आणि पदाधिकारी पुन्हा आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. त्यामुळे येत्या काळात मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल असे शेख खिजर यांनी सांगितले. गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणच्या ▶ उर्वरित पान २ वर



*शेतकरी मल्टीसर्विसेस अँड दैनिक मराठवाडापत्र कार्यालय येथे शिवभक्त अजय कदम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वाढदिवस साजरा करताना नगराध्यक्ष भारत दादा जगताप, युवा नेतृत्व दत्तात्रेय आप्पा जमाले, मा. नगरसेवक आत्माराम अण्णा जमाले, शहादेव लोंढे, शिवाजी कदम, रवी लांडे, विनोद डांबे, ज्ञानेश्वर शिंदे, दिलीप चन्ने, उपस्थित होते. ( छाया : संभाजी लांडे पा.)*

## अर्थसहाय्यातून होणार शेतकऱ्यांची अर्थसमृद्धी !

**ग्लोबल विकास ट्रस्ट व AU स्मॉल फायनान्स बँकेचा संयुक्त उपक्रम ; फळबाग लागवडीसाठी पात्र लाभार्थ्यांना कर्जाचे वितरण**

**सिरसाळा । प्रतिनिधी**

मराठवाडा हा विभाग कायम दुष्काळी म्हणून गणल्या जातो. इथे कधी दुष्काळ पडतो तर कधी इथे अतिवृष्टी होते. नैसर्गिक आपत्तींशी सामना करणारा शेतकरी कायम आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडलेला असतो. पारंपारिक शेतीतून मिळणारे उत्पन्न अतिशय



तुटपुंजे असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनातील गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत शेतकरी शाश्वत शेतीतील नाविन्यपूर्ण बदल कसे स्वीकारणार? हा प्रमुख प्रश्न त्यांना भेडसावतो. यावर जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टने प्रभावी उपाय योजला असून फळबाग लागवड करण्यास इच्छुक असलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

## कऱ्हेवडगांवमध्ये बंद दाराआड ग्रामसभा, ग्रामस्थांनी केला पर्दाफाश

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कऱ्हेवडगावात चक्क बंद दाराआड ग्रामसभा होत असल्याचे समोर आले आहे. याच भोंगळ कारभाराचा ग्रामस्थांनी पर्दाफाश केला आहे. या पर्दाफाशानंतर सरपंच आणि ग्रामसेवकावर सीईओंनी कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात अशा अनेक ग्रामपंचायती आहेत की त्या ग्रामपंचायतींमध्ये नुसता भ्रष्टाचारच सुरू आहे. अगदी अशाच प्रकारचा कारभार आष्टी तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथे सुरू आहे. येथे ग्रामसभाही बंद दाराआड घेतली जाते, या ग्रामसभेसंदर्भात गावात कोणतीही नोटीस लावली जात नाही, मागच्या पाच वर्षांपासून हा प्रकार सुरू आहे. याबाबत पवन सांगळे यांनी अनेकवेळा तक्रारीही केलेल्या आहेत. मात्र या तक्रारींवर अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, त्यामुळेच पवन सांगळेसह ग्रामस्थ आक्रमक बनले आहेत.

## पीक पाहणी शेतकऱ्यांच्या हिताची : शासन, प्रशासन आणि शेतकरी यांची एकत्रित जबाबदारी

**२० डिसेंबर पासून रब्बीची पीक पाहणी करा : तहसीलदार शेळके**

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सध्या ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व्हे ( डि सी एस ) , ॲग्रीस्टॅक आणि फार्मर आयडी या शासकीय उपक्रमांची मोठी लगबग सुरू असून , ही मोहीम केवळ कागदोपत्री मर्यादित न राहता थेट शेतकऱ्यांच्या हिताशी जोडलेली असल्याचे स्पष्ट होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत ॲग्रीस्टॅक संकल्पनेअंतर्गत राबविण्यात



येत असलेल्या ई-पीक पाहणी मोहिमेमुळे भविष्यातील पीक विमा , अनुदान , नैसर्गिक आपत्ती मदत , नुकसान भरपाई आणि विविध कृषी योजना थेट पिकांच्या नोंदींशी संलग्न होणार आहेत.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन शेतकऱ्यांना वेळेवर बी , बियाणे , खते , अनुदान योजना आणि पीक विम्याचा लाभ मिळावा यासाठी सातत्याने दक्ष राहून काम करीत आहे. विविध आराखड्यांचा आढावा , क्षेत्रीय पाहणी आणि अधिकाऱ्यांशी नियमित समन्वय साधत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे शेतकरी केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे. राज्य शासनाच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ पत्रान्वये ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व्हे ( डि सी एस ) मोबाईल पच्या माध्यमातून राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार ई-पीक पाहणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून , शेतकरी स्तरावर तसेच सहाय्यक स्तरावर ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांचे कैवारी मा. आ. भीमराव धोंडे यांच्या मागणीला यश

**महेश (कडा) कारखान्याचे लायसन्स पूर्ववत ; आष्टी मतदार संघाची कामधेनु होणार पुनर्जीवित, बळीराजा आनंदित**

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदार संघाची कामधेनु असलेल्या महेश (कडा) सहकारी साखर कारखान्याचे लायसन्स तांत्रिक कारणाने रद्द करण्यात आले होते. हे लायसन केंद्र शासनाने पूर्ववत केले आहे. हजारो ऊस उत्पादक शेतकरी, सभासद असलेला महेश सहकारी साखर कारखाना हा अनेक वर्षे दुष्काळी परिस्थितीमुळे व पाण्याच्या टंचाईमुळे अनेक वर्षे बंद पडल्याने,यासह राजकीय



हस्तक्षेप वाढल्याने अडगळीत पडल्याने शेतकरी, कामगार, सभासद यांचे प्रचंड नुकसान झाले. सध्या या मतदार संघात उजनी व इतर धरणातील अनेक योजनेतून पाणी उपलब्ध झाल्याने हजारो एकर क्षेत्रावर ऊस उभा आहे. या कारखान्याचे पुनरुज्जीवन करताना तो खाजगी न करता सहकारीच रहावा. ▶▶ उर्वरित पान २ वर